# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,परभणी

**(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)**

E-mail ID :- rdcparbhani@gmail.com फॅक्स - (02452) 223774 दुरध्वनी - 223702

वाचा:- 1. शासन निर्णय पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक 07 एप्रिल 2003
2. शासन निर्णय पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक दिनांक 31 जुलै 2013
3. शासन निर्णय पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक दिनांक 22 ऑगस्ट 2017
4. पोलीस अधिक्षक, परभणी यांचे पत्र क्र. 3156/जिल्हा विशेष शाखा/2017 दि. 24 ऑगस्ट 2017

जा.क्र.2017/अे-1/गृह/पोल/दीपावली/सिआर-6 – दिनांक : 24.08.2017

## :: आ दे श ::

ज्याअर्थी संदर्भ क्र. 3 वरील शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या दि. 10.08.2017 रोजीच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम 2017 च्या नियम 5 (3) व त्यासोबत दिलेल्या स्पष्टीकरणात्मक टिपणीनुसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक इत्यादींच्या वापराबाबत श्रोतेगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी जिल्ह्याच्या निकडीनुसार वर्षामध्ये 15 दिवस निश्चित करुन सकाळी 6 वाजल्यापासून ते रात्री 12 वाजेपर्यंत सूट जाहिर करण्याकरिता संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना राज्य शासनाद्वारे प्राधिकृत करण्यात आले आहे.

तसेच सन 2017 या वर्षासाठी राज्य शासनाने दि. 05/09/2016 रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या 15 दिवसांपैकी आतापर्यंत 5 दिवसांची सूट राज्यभर उपयोगात आलेली असल्याने सर्व संबंधीत जिल्हाधिका-यांनी आगामी उत्सव कालावधी लक्षात घेता सन 2017 साठी उरलेले 10 दिवस घोषीत करण्याबाबत सूचित केले आहे.

आणि, ज्याअर्थी संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वये जिल्हा पोलीस अधिक्षक, परभणी यांनी दिनांक 25/08/2017 रोजी जिल्ह्यामध्ये शहरी भागात व ग्रामीण भागामध्ये उशिरापर्यंत गणपती स्थापना होत असल्याने उक्त दिनांकास एक दिवस ध्वनी प्रदुषण संदर्भान्वये वाद्य वाजवण्याची सुट मिळावी, असे मत नमूद केले आहे.

त्याअर्थी मी **पी.शिवशंकर, जिल्हादंडाधिकारी परभणी** या आदेशाद्वारे संदर्भ क्र. 3 वरील शासन निर्णयानुसार आगामी उत्सव कालावधी लक्षात घेता सन 2017 साठी उरलेले 10 दिवसांसाठी फक्त ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी 6 वाजल्यापासून रात्री 12 वाजेपर्यंतच्या वेळेची सवलत परभणी जिल्ह्याकरिता खालील नमूदप्रमाणे निश्चित करून जाहिर करण्यात येत आहे.

1. गणपती उत्सव : **5** दिवस (स्थापना दिवस, दुसरा दिवस, पाचवा दिवस, गौरीविसर्जन व अनंत चर्तुदशी)
2. नवरात्री उत्सव : **2** दिवस (अष्टमी व नवमी)
3. दिवाळी : **1** दिवस (लक्ष्मीपूजन)
4. ख्रिसमस : **1** दिवस
5. 31 डिसेंबर : **1** दिवस

या आदेशाची अंमलबजावणी या जिल्ह्याचे हद्दीपुरती मर्यादित राहील

*स्वाक्षरीत/-*

**(पी.शिवशंकर)**

**जिल्हादंडाधिकारी परभणी**

**प्रतिलिपी माहितीस्तव :**

1. मा.प्रधान सचिव, गृह विभाग (विशेष), मंत्रालय, मुंबई-32.
2. मा.संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय नविन प्रशासन भवन, 15 वा मजला, मुंबई.
3. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद.

**प्रतिलिपी आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :**

4. जिल्हा पोलीस अधिक्षक, परभणी.
5. तालुका दंडाधिकारी, परभणी/पुर्णा/पालम/गंगाखेड/सोनपेठ/मानवत/पाथरी/सेलू/जिंतुर.
6. जिल्हा माहिती अधिकारी, परभणी यांना स्थानिक वृत्तपत्रातून व्यापक प्रसिद्ध करण्यास्तव.
7. या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिद्धीसाठी.

*(स्थळप्रत मा.जि.दं.अ.यांचे स्वाक्षरीत/-)*

**जिल्हादंडाधिकारी परभणी करिता**